Vol 6 Issue 3 Sept 2016

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 3 | September - 2016

GRT Golden Research Thoughts

आप्पासाहेब खोत यांच्या कथासाहित्यातील सामाजिकता

डॉ.शिवलिंग मेनकुदळे
मराठी विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा .

निबंधाचा सारांश

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विकसित झालेल्या ग्रामीण साहित्यात विविध सामाजिक जाणीवा अनेक ग्रामीण लेखकांनी आपल्या लेखनातून प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कथा हा अत्यंत महत्वाचा साहित्यप्रकार ग.दि.माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, डॉ. राजन गवस यांच्यासारख्या अनेक ग्रामीण लेखकांनी समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. आप्पासाहेब खोत हे आजच्या समकालीन ग्रामीण लेखकांमधील प्रतिभावंत लेखक म्हणून ओळखले जातात. ग्रामीण समाज जीवनातील विविध प्रवृत्ती, परंपरा, बदलते सामाजिक संदर्भ यांचा उहापोह त्यांनी आपल्या कथा वाङ्.मयातून केलेला पहावयास मिळतो.

'माती आणि कागुद' या कथासंग्रहातून ग्रामीण माणसांची जीवनपध्द्ती, त्यांचे स्वभाव, त्यांच्या ईर्षा, मानपान, त्यांची दुःख, लोपत असलेले वैभव, प्रतिष्ठेसाठी पारंपरिक संकेतांना चिकटून बसणारी इमानदार घराणी, भरलेले शिवार, त्यात राबणारे शेतकरी, प्राणीजीवन, रानमाळ, या सर्वांना चैतन्य देणारा बदलता निसर्ग, बदलती खेडी, बदलती ग्रामसंस्कृती, कृषी संस्कृती अशा अनेक सामाजिक जाणीवांचा प्रत्यय येतो.

आप्पासाहेब खोतांच्या कथासाहित्यातून आशय व अभिव्यक्तिचे वेगळेपण, ग्रामीण मातीचा जिव्हाळा भरून राहिलेला दिसतो. तरल भावनांचे तरंग त्यांच्या कथांमधून उमटताना दिसतात. आप्पासाहेब खोतांचा ओढा आदर्श चित्रणाकडे असला तरी खेडयातील माणसांची दुःख, त्यांचे वैर, त्यांची दैन्यगत परिस्थिती, त्यांचा दांभिकपणा, त्यांचे प्राणी व निसर्गावरील निर्व्याज प्रेम, मनात लपलेले पीळ त्यांनी तन्मयतेने रंगविले आहेत. त्यांची भाषा ग्रामीण पण सरळ अर्थ व्यक्त करणारी आहे. ग्रामीण माणसाची भाषा आपल्या कथा लेखनातून व्यक्त केल्यामुळे ती वाचकांच्या अंतकरणाला स्पर्श करते. त्यांच्या निसर्गकथांनी मराठी साहित्याला वेगळे दर्शन घडविले आहे. ग्रामीण वास्तव्यांचं अनेकपदरी भान त्यांच्या लेखनाला असल्याचा प्रत्यय वाचकांना सहजपणे अनुभवास येतो.

प्रस्तावना :

आधुनिक मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले आहेत. त्या प्रवाहांमुळे मराठी साहित्य समृध्द झाले. मर्यादित समाजदर्शनाच्या स्वरूपात का होईना १९७० पासून मराठी साहित्य नव्या तेजाने अवतरू लागले. एका सामाजिक वास्तवाचे भान मराठी साहित्याला लाभले. या प्रेरणेतूनच १९८० पासून कथा, कादंबरी, नाटक, काव्य इ. अनेक प्रकारची निर्मिती होवू लागली. अनेक लेखकांनी मराठी कथेला एका वेगळया वळणावर नेऊन ठेवले. तेवढयाच ताकदीचे लिखाण करणारे आप्पासाहेब खोत यांचे 'गवनेर', 'महापूर', 'रानगंगा', 'कळवंड', 'मरणादारी', 'माती आणि कागुद' हे कथासंग्रह प्रकाशित झाले. त्यातील 'माती आणि कागुद' या कथासंग्रहात अस्सल ग्रामीण कथा रेखाटल्या आहेत.

'माती आणि कागुद' मधील कथाबीज :–

आप्पासाहेब खोत यांचे ग्रामीण साहित्यातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. 'माती आणि कागुद' या कथासंग्रहात एकूण १६ कथांचा समावेश आहेत्र दारिद्रयामध्ये पिचलेल्या, कष्टकरी जीवनाचे दर्शन घडविणारा हा कथासंग्रह आहे. मानवी जीवनातील सामाजिक वास्तव मांडणा–या या कथा मानवी जीवनाला व्यापून राहिल्या आहेत. हे सत्य लपविता येणार नाही. ''अज्ञानामुळे भोगावे लागणारे दारिद्रय, दारिद्रयामुळे होत असलेले शोषण आणि शोषणामुळे उत्पन्न होणारे दुःख विविध मार्गांनी या कथासंग्रहात दिसून येते. आप्पासाहेबांच्या कथेतील परिसर प्रामुख्याने ग्रामीण आहे. त्या ग्रामीण परिसरातल्या माणसांच्या श्रध्दा, विश्वास, मूल्ये यांच्यासह तो मूर्त होतो. तेथील दारिद्रय, अज्ञान आणि नैसर्गिक व सामाजिक दुःख यांच्या विविध छटा आप्पासाहेबांच्या कथेत येतात. ग्रामीण भागातल्या माणसांच्या साधेपणाबरोबर त्यांच्या ईरसालपणाचाही प्रत्यय येतो''.[१] ग्रामीण परिसरातील ही पात्रे स्वाभाविकपणे ग्रामीण भाषा बोलतात.

'गळफास' या कथेत विलास व अंजना सावकारी कर्जामध्ये फसलेली आहेत. एकीकडे

त्यांना सावकारी कर्ज फेडण्याची चिंता आहे तर दुसरीकडे व्यसनाच्या आहारी गेलेल्या पंडीत या आपल्या मुलाची चिंता आहे. 'माती आणि कागुद' मध्ये शंकर जगताप व त्याचा मुलगा संपत यांच्यातील नाजूक नातेसंबंध गुंफले गेले आहेत. 'पदराआडची माया' या कथेत बळीरामाची आई पार्वतीबाई कॅन्सरने ग्रस्त आहे. 'चिमणीचं घरटं' या कथेत प्राणिमात्रावर प्रेम करणारी शांता आहे. तर दुसरीकडे चिमण्यांना अद्दल घडविण्यासाठी त्यांचा जीव जाईपर्यंत मारणारा रंगा आहे. 'सोन्याची आई' या कथेत सोन्याला आईची माया मिळावी म्हणून अनुसयाशी लग्न करायला तयार असणारा बजरंग रूढी, परंपरांच्या विळख्यात सापडतो व शेवटी त्यांच्या नशीबी दुःखच येते. 'परतफेड' या कथेत सरकारी यंत्रणेमध्ये जर आपण आत्महत्या केली तर आपल्या मागच्यांना १ लाख रू. मिळतील म्हणून आत्महत्या करणारा नारायण सर्वांनाच विचार करायला लावतो. 'चकवा' ही कथा मुलाविषयीची काळजी करणा-या सोना मावशीची आहे. ''काय करू बाई इतका उशीर का झाला आसंल? पाच वाजता हिथं ठेवल्यागत येतो म्हटला हुता, मग काय म्हणून इतका उशीर झाला आसंल तरी मी त्याला म्हणत हुतो, नवी गाई हाय, घेवून जाऊ नकोस, तर माझं कोण आईकतया. मालक म्हणालं 'न्हेऊ दे गाई म्हंजी चटक्यात ईल. सणावाराचं एस्टया मिळत न्हाईत, गर्दी असतीया''.[२] ''आपल्या मुलाची काळजी करणारी आई, तिच्या जीवाची झालेली घालमेल आप्पासाहेबांनी अचूक टिपली आहे.

'चुलीच लाकूड' ही लक्ष्मीच्या फाटक्या संसाराची कथा आहे. 'खिचडी' या कथेत आयुष्याची खिचडी झालेली आहे. ही व्यथा मांडली आहे. खिचडी धड शिजली तर बरी नाहीतर बेचव होते. तसा संसार दारिद्रयामुळे उघडा पडतो. दारूडया बापामुळे घरात अन्नाचा कण नाही, बाळंतपणामुळे बाई ओल्या अंगाने मजुरीला जाऊ शकत नाही. लहानवयात सुरेखाला आलेले शहाणपण आप्पासाहेबांनी दाखवून दिले आहे. व्यक्तिजीवनातील ही पात्रे आप्पासाहेबांच्या परिचयाची असल्याची दिसतात. आप्पासाहेबांची निरिक्षणशक्ती कमालीची आहे. म्हणूनच कथासंग्रहाचे कथाबीज जीवंत असल्यासारखे वाटते. प्रत्येक पात्र मूर्त स्वरूपात आपल्या आजूबाजूला वावरताना दिसतात. त्यांच्याशी आपले भावबंध जोडले जातात. इतकी कमालीची ताकद त्यांच्या या कथासंग्रहात दिसून येते.

'वठलेलं झाड' ही चंदरनानाच्या उभ्या आयुष्याची जीवंत कथाच म्हणावी लागेल. आपला पोरगा शिकून मोठा झाला की आयुष्याचा पोशिंदा होईल पण सर्व व्यर्थ. मुले मोठी झाली की ती आईबापाला विसरतात. आईबाप त्यांना अडचण वाटू लागतात. वठलेल्या झाडाप्रमाणे त्यांची गत होते. हे सत्य मांडताना कुठेही आप्पासाहेबांची लेखणी रंगेल होत नाही. सहजतेतून त्यांची ही कथा समोर येते. ''कधी कधी वसंता यायचा. तिला देव भेटल्याचा आनंद व्हायचा. शे-दीडशे हातांवर ठेवायला हे सगळं पाहून चंदरनाना आतल्या आत झुरायचा तरीपण चंदरनाना त्यांच्याबरोबर फटकून तरी कसा वागलं. किती केले तरी त्याचा मुलगा होता. महिन्या दोन महिन्यातून नाही आला तर जीव तळमळायचा. त्यांन यावं, त्याला डोळं भरून पहावे असं त्याला वाटायचं पण तेही त्याच्या नशिबी नसायचं''[३] मुलाच्या न येण्यानं वठलेल्या झाडाप्रमाणे जीवन जगणारा चंदरनाना आपल्या मुलाची वाट पाहत राहणाऱ्या बापाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. तर एकीकडे परिस्थितीनुरूप बदल स्वीकारणारे निवासराव आपल्या नातवाच्या भविष्यासाठी जमिनीचा सौदा करतात. आप्पासाहेब खोत यांच्या 'माती आणि कागुद' या ग्रामीण कथासंग्रहात अस्सल ग्रामजीवनाचे चित्रण दिसून येते.

'माती आणि कागुद' : सामाजिक जाणिवा

साहित्य आणि समाज यांचे अतूट नाते आहे. जीवनाचे विविध संदर्भ साहित्यातून अवतरत असतात. कोणत्याही साहित्यिकाची कलाकृती ही समाजजीवनाच्या मनावर अधिराज्य गाजवू लागली की साहित्यकृती वर्षानुवर्षे जीवंत राहते. आप्पासाहेबांच्या कथासंग्रहाचे वैशिष्टय आहे की त्यांचा 'माती आणि कागुद' हा कथासंग्रह मानवी जीवनाचे अनेक रंग साकारतो. समाजजीवनातील कृषी व्यवस्था, निसर्ग, अवतीभवतीचा परिसर, मानवी सुख दुखासह कथासंग्रहातून दिसून येतो, आप्पासाहेबांच्या कथासंग्रहात या कृषी संस्कृतीत एकटे, एकाकी उपेक्षित जीवन जगत असतानाही सांभाळलेले लोकाचार, जपलेली माणुसकी, त्यांचे सणवार, जत्राखेत्रा, देवदेवस्की, त्यावरील त्यांच्या अतीव श्रध्दा, मोडका संसार सांभाळणाऱ्या स्त्रियांची दुःखे, त्यांच्या मनातील काहूर, व्दंद, यातील शोकात्मभाव अत्यंत उत्कटतेनं प्रत्ययाला येतो.

विहीर, मोटनाडा, पीकपाणी, झाडेझुडपे, राबती माणसे, तेथील प्राणिसृष्टी, तिथला ऊन, वारा आणि तिथला इमानाने घाम गाळणारा शेतकरी हे जसे त्यांच्या कथेत येतात. त्याचप्रमाणे नवीन घडणाऱ्या स्थित्यंतरांनी माणसाच्या मनाची होणारी उलाघाल, राजकारणांन केलेल्या चिरफाळया, सारचं कसं उखडलेल्या झाडासारखं बनलेलं ग्रामजीवन, तिथलं वातावरण, तिथला निसर्ग याचं एकरूप दर्शन अनेकदा प्रतिमांच्याद्वारे आप्पासाहेब करतात. विशेषतः कोल्हापूर परिसरातील जीवनवैशिष्टये त्यांच्या कथांतून व्यक्त होताना दिसतात. बागायती पिकावू शेती, ग्रामीण संस्कृती त्यांच्या लेखनीचे लक्ष्य आहे. त्यातही त्या शेतीत राबणारी, कष्ट करणारी, शेतमजूर अशा स्त्री-पुरूषांची भावचित्रं त्यांनी रंगविली आहेत. गरीब लहानसा शेतकरी, त्याचा संसार, माणसांच्या नात्याची जपली जाणारी मायाममता, शेरडा-कोकरांवरील, बैलांवरील लळा, शेतावरची आत्यंतिक निष्ठा, मजुराची हलाखी, त्यांनी दैन्याशी कवटाळीतच जपलेली श्रद्धा, माती खालच्या मातीतला जिव्हाळा, तिथून हिरवाळात आलेले पीकपाणी आणि मानवी मन यांचे भावरम्य दर्शन त्यांनी घडविले आहे.

आप्पासाहेब खोत यांचा मूळ प्रकृतीधर्म सूक्ष्म, तरल, संवेदनशील अनुभूती ताकदीने उभा करणे हा आहे. पंचद्रियांची तृप्ती करण्याची ताकद त्यांच्या कथेत आहे. नियती व्यक्ती, परिस्थिती अन विकृती यांतून निर्माण झालेल्या सशक्त आणि नाविण्यपूर्ण पण गंभीर स्वरूपाच्या अनुभूती प्रकट करणे हा त्यांच्या प्रतिभेचा धर्म आहे. 'जेवता जेवता सर्जेराव म्हणाला, संदिप तू धंदा करतुयास हयेचं वाईट वाटत न्हाई खरं तू मशीन इकलीस त्येच लई वाईट वाटतय, मळणी मशीन या कथेत बाप लेकाच आलेले संवाद, ''आता नको मी दळाण घेऊन गिरणीत जाणार हाय. लाईटची बॉब रोजचीच हाय. उदयाच्याला भाक्रीला पीठ न्हाय. घरात कोण न्हाई. तू

थांब घरात मी जातो गिरणीत. तिच्या आईनं तिच्या इच्छेवर पाणी ओतलं. या संवादात ग्रामीण जीवनातील दोन वेळच्या अन्नाची भ्रांत आहे. पुरेश्या भौतिक सुविधा तर सोडाच जीवन अंधारमय आहे. यावर विश्वास ठेवावा लागतो. त्यांच्या या कथातून शेतकरी, मजूर वर्ग या लोकांच्या जीवन जगण्याच्या पध्दती, त्यांचे आचारविचार, नीतिकल्पना, त्यांचे सामाजिक संकेत व त्यांच्या विविध जीवन संदर्भाच्या अनुषंगाने व्यक्त होणा-या भावभावना व्यक्त झाल्या आहेत.

खेडयातील कुटुंबव्यवस्था, त्या कुटुंबातील माणसांची असणारी परस्पर नाती, त्यातील हळूवारता, ताणतणाव, त्याग आणि दांभिकपणा यांचे जसे आशय कथांना लाभले आहेत. तसेच सोयरीकीच्या संबंधातून निर्माण होणारी नाती आणि त्यातील नाजूकपणा आणि गुंतागुंत हेही विषय या कथातून आलेले आहेत. स्त्रीची अनेक रूपावस्थेतील नाती यांची विलक्षण भावनिकता, त्या नात्यांमधील पावित्र जपताना तिच्या अंतःकरणात निर्माण झालेली व्दंव्दे यांचे सूक्ष्म चित्रण अत्यंत हळुवारपणे आप्पासाहेब चितारतात. स्त्री चित्रणातील भावोत्कटता त्यांच्या अनेक कथांतून प्रत्ययाला येते. स्त्रीचित्रे, पुरूषचित्रे व कौटुंबिक भावचित्रे, त्यांचे नातेसंबंध म्हणजे खोतांच्या कथांचा आत्मा आहे. त्यांच्या ग्रामीण जीवनातील 'स्त्री' ही ग्रामीण विशिष्ट मानसिकतेतून अत्यंत संवेदनशीलतेने चित्रित झाली आहे. त्या स्त्रीचा त्याग, कष्ट, सोशिकपणा, भाबडेपणा, तिची निष्ठा, मायाममता, धीरता, तिच्या झिजण्यातच ती मानत असलेली जन्मसार्थकता या साऱ्या गुणवैशिष्टयांचे हळूवार पदर उलगडत केलेली चित्रणे मोठी महनीय आहेत. मराठी ग्रामीण स्त्रीचे अंतरंग खुले करणारे आप्पासाहेब खोत यांच्या कथेतच प्रकट झालेले दिसतात.

आप्पासाहेब खोतांचा ग्रामीण माणूसही असाच वेगळया धाटणीनं उभा राहिलेला दिसतो. ''ग्रामीणत्वाच्या गुणदोषांचे सारेच जडाव त्या माणसाला लगडलेले दिसतात. माणूस आणि निसर्ग यांचे एकरूपत्व कधी होते ते कळतच नाही. एवढी कमालीची ताकद त्यांच्या या कथासंग्रहात असून सामाजिक जाणीवा ठायी-ठायी दिसून येतात''.[४] व्यसनाच्या आहारी जाणारी तरूणपिढी, सावकारी कर्जामुळे कर्जबाजारी झालेला विलास, जमिनीविषयी आपुलकी बाळगणारा शंकर जगताप, चिमण्यांना अद्दल घडविणारा रंगा, काबाडकष्ट करणारा बजरंग, आत्महत्या करून स्वतःचा संसार वाचावा म्हणून शासकीय मदत मिळवणारा नारायण इत्यादी अनेक पात्रे समाजजीवनातील विविध समस्यांनी ग्रासलेले आहेत. ''....मी खूप हुशार होतो. शिकलो असतो तर वसंता आणि भगवानराव यांच्यापेक्षाही मोठा अधिकारी झालो असतो. पैशाअभावी शिक्षण घेऊ न शकणारी पिढी एकीकडे उभी राहते. तर एकीकडे आपल्या भावडांना सांभाळण्यातच धन्यता मानते. ''बरं झालं लेका, इस्कीम गावात आली ते आमच्या जल्म पाण्याविगार वनवासात गेला ते गेला निदान तुमच्या पिढीला तरी गारवा मिळू दे. जा बाबा त्यास्नी घेऊन. कमल सर्जेरावकडे पहात म्हणाली''.[५] शेतात राबणारी कष्टकरी माणसे, पाण्याविना हाल सोसणारी माणसे इ. अनेक प्रकारची माणसे या कथासंग्रहात भेटतात.

समाजजीवनाचे फार जवळचे व सख्यत्वाचे नाते निसर्गाशी आहे. गवळण या कथेत गवळण नामक म्हशीने मांडलेले स्वगत विचाराधीन बनविणारे आहे. उपकाराची परतफेड करणारी ही गुरे, ढोरे इमाने इतबारे वागताना दिसतात. परिसरापेक्षा त्या परिसरातील माणसांच्या मनाशी इमान बाळगून त्यांची लेखणी आविष्कृत होते. कुटुंब, जात, गावकी, धर्म या गोष्टी त्यांच्या कथासंग्रहात पाहायला मिळतात. आप्पासाहेबांना ग्रामीण वास्तवाची चांगली जाण व समज आहे. हे त्यांच्या कथा वाचल्या म्हणजे लक्षात येते. खेडे, खेडयाची रचना, तेथील समाजव्यवस्था, त्या व्यवस्थेतील स्तर आणि या सर्वांमधून उभे राहणारे जीवन त्यांच्या चांगले परिचयाचे, अनुभवाचे आहे. तेथील विविध वृत्ती प्रवृत्तीची माणसे आणि त्या कथा, व्यथा, वेदना, समस्या, त्यांनी त्यांच्या कथांमधून शब्दबध्द केल्या आहेत. आप्पासाहेबांच्या कथांच्या निमित्ताने खेडयातील लोकजीवनात रूढ असणारे, धार्मिक विधी, समजूती, रितीरिवाज यांचे दर्शन वाचकांना घडते. निसर्गाच्या पार्श्वभूमीवर खेडयातील अज्ञान, दारिद्रय, शोषण, या शोषणात पिळून निघणारी गरीब, श्रध्दाळू, भाबडी आणि क्रूर दृष्टबुध्दीची माणसे यांचेही तेवढेच वास्तववादी चित्रण केले आहे.

आप्पासाहेबांनी 'माती आणि कागुद' या कथा संग्रहाच्या निमित्ताने समाजजीवनाचे वास्तव मांडून वाचकाला विचारधीन बनविले आहे. हजारो वर्षे दारिद्रयात खितपत पडलेल्या या माणसांसाठी आपले संवेदनशील मन तयार झाले पाहिजे. अज्ञान, रूढी, परंपरा दूर सारून नव्या समाजाच्या उभारणीसाठी आप्पासाहेब खोतांच्या 'माती आणि कागुद' हा कथासंग्रह उभा आहे. असे म्हणावयास हरकत नाही. समाजातील विविध विषयांना हात घालून पिचलेल्या, काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी वर्गाचे चित्रण त्यांनी या कथासंग्रहातून घडविले आहे.

भाषा विशेष :–

आप्पासाहेब खोत यांच्या कथासंग्रहात आलेली कोल्हापुरी बोली मोठी चित्रात्मक, रसरशीत व ध्वन्यात्मक अशी आहे. चुलीच्या निखाऱ्यावर भाजलेल्या ऊन ऊन खरपूस भाकरी सारखी गावरान गोडवा पोटात घेऊन अवतरणारी त्यांची भाषा हा त्यांच्या वाङ्.मयातील खास किंमती ऐवज म्हणावा लागेल. निसर्ग आणि माणूस तसेच प्राणीसृष्टी यांचे आदिम नाते आप्पासोबांनी अत्यंत कलात्मकतेने चित्रित केले आहे. अस्सल ग्रामवास्तव व त्याचे आविष्कारण करणारी, त्या वास्तवाचा अविभाज्य भाग असलेली बोली यांचा गोफ एक कलात्मकता प्रत्ययाला आणते. आप्पासाहेबांनी कथासंग्रहातील पात्रांच्या जीवनातील कारूण्य व अतृप्त जीवनाचे आवाहन यादृष्टीने मांडलेली स्वगतशैली महत्त्वाची वाटते. भाषेचे, प्रतिमांचे, संवेदनांचे मराठी कथासंग्रहात इतक्या समृध्दतेने आलेले गावरानपण स्वगतामुळेच प्रभावी वाटते.

निवेदनाचे वेगळेपण –

आप्पासाहेब खोतांच्या कथालेखनामागे ग्रामीण प्रेरणा आहेत. तेथील लोक ग्रामीण भाषेचा वापर करतात. कथानिवेदनाचे ते एक अपरिहार्य अंग असते. हया निवेदनातल्या प्रतिमांमधून ग्रामीण परिसर जीवंत होतो. ''मृग नक्षत्र सुरू झालं आणि दुसऱ्याच दिवशी पाऊस सुरू झाला. मृगाच्या पावसाच्या पहिल्या सरीने मातीला मनोहर सुगंध सुटला. माती न्हाती धुती झाली. जमिनीला वापसा आला. सगळया शिवारात माणसांनी पेरणीचा धायटा उडविला... हरीनानीही आपली पेरणा उरकली. भात आणि सोयाबीन

पेरून घेतलं भूईमूग टोकणला. रोजगारी माणूस मिळत नव्हतं म्हणून घरच्याच माणसांनी पेरणी उरकली. सगळी पेरणी उरकायला आठ दिवस लागलं.''[६] आप्पासाहेबांचे कथानिवेदन वैशिष्टपूर्ण आहे. एखादी व्यक्ती शारीरिक हावभावांसह, तिच्या मनातल्या भावभावनासह ते साक्षात करतात. त्यांच्या कथेतल्या व्यक्ती संख्येने अनेक असल्या तरी त्यांना स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व असते. आप्पासाहेब कधी तटस्थ निवेदक असतात तर कधी कथेतल्या पात्राने केलेले असावे तसे निवेदन करतात. 'माती आणि कागुद' या कथेतील शंकर जगताप, संपत, शंकर, चेअरमन, शंकराची आई ही सर्वच पात्रे स्वभावानिशी प्रकट होतात. मुलावर भडकणारा बाप, मायाळू, प्रेमळ संपतची आई, आपलेच म्हणणे खरे करणारा संपत अशी स्वभावचित्रे दिसतात. अनेक पात्रे या कथासंग्रहात सहजतेने वावरताना दिसतात. 'सौदा' या कथेतील निवासराव, भगवानराव, वसंत तर 'पदराआडची माया' मधील बळीराम, बळीरामची आई, लता, सुरेखा, अशोक अशी कितीतरी पात्रे या कथेत येतात. पण ती सगळी विविध हालचालींनी लकबींनी जिवंत झालेली आहेत. त्यांना जिवंत करण्याचे सामार्थ्य आप्पासाहेबांच्या लेखणीत निश्चितच आहे.

निष्कर्ष

आप्पासाहेब खोतांनी 'माती आणि कागुद' या कथासंग्रहात समाजजीवनाचे वास्तव मांडले आहे. दुःखी, कष्टकरी, शेतकरी, विधवा, जीवन, लैंगिक अतृप्ती, मारहाण, शिवीगाळ, आच, छळ, सोसणारी माणसे यांचे चित्रण केले आहे. अस्सल निसर्गचित्रण, निसर्गाची भयानकता व पोशिंदा निसर्ग अशी निसर्गाची विविध रूपे साकारली आहेत. त्यांच्या कथासंग्रहातील माणसे काबाडकष्ट करून आपल्या मुलाबाळांनी मोठं होण्याची स्वप्ने पाहणारी माणसे आशावाद व्यक्त करताना दिसतात. माती आणि कागदासाठी भाऊबंदकी वाढवणारी माणसे या कथासंग्रहात भेटतात. सावकारी कर्ज, सरकारी फार्स, फसवी माणसं, मानवी मुखवटे आप्पासाहेब खुबीने रंगवितात. अस्सल बोलीभाषेचा वापर केल्याने कथासंग्रहातील माणसांना जिवंत करण्याचे सामर्थ्य आप्पासाहेबांच्या लेखणीत आहे.

संदर्भ सूची :–

१.नलगे चंद्रकुमार : ग्रामीण वाड्.मयाचा इतिहास, ऑगस्ट २०१३, चित्रमित्र पब्लिसिटी, पृष्ठ क्र.१०६

२.खोत आप्पासाहेब : 'माती आणि कागुद' ऑगस्ट, २०१०,अजब पब्लिकेशन, पृष्ठ क्र.६३

३.खोत आप्पासाहेब : 'माती आणि कागुद' ऑगस्ट, २०१०, अजब पब्लिकेशन, पृष्ठ क्र.१११

४.नायटा (संपादक) विजय : लोकराज्य,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र शासन, जून-जुलै २०११, मुंबई

५.खोत आप्पासाहेब : 'माती आणि कागुद' ऑगस्ट, २०१०, अजब पब्लिकेशन, पृष्ठ क्र.१३०

६.यादव आनंद : ग्रामीणता :साहित्य आणि वास्तव, २००१ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org